# निशाणी क्र.१६ वरील आदेश

१. प्रतिवादी नं.२ यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं.१ यांना समन्स बजावणीकरीता योग्य तो आदेश करण्याकरीता दाखल केला आहे. यातील वादींनी प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा सरस निरस मानाने वाटपासाठी व पृथ्थक कब्जासाठी दाखल केला आहे. यातील प्रतिवादी नं.१ हा प्रतिवादी नं.२ चा मुलगा असुन तो व्यवसायानिमित्त परराज्यात असतो. यातील प्रतिवादी नं.२ ही गुळेवाडी येथे कायमस्वरुपी राहणेस आहे. दि. ०२/०३/२०२३ ते ०४/०३/२०२३ रोजीपर्यंत प्रतिवादी नं.२ ही तिच्या नि.१ मधील राहत्या पत्यावर संपुर्ण दिवसभर घरीच होते. यातील वादी यांनी प्रतिवादी नं.१ हा गावी आला आहे म्हणुन वादीचे प्रतिज्ञापत्र सोबत न दाखल करता व कोणताही कागदोपत्री पुरावा न देता सदरचा अर्ज नि.१५ ला दिला होता. त्याप्रमाणे आटपाडी न्यायालयातील बेलीफ यांनी असा रिपोर्ट दिला की, "तपास केला असता सदर प्रतिवादी नं.१ हे समक्ष भेटले नाहीत. तसेच चौकशी केली असता प्रतिवादी नं.१ हे बाहेरगावी असतात, संध्याकाळपर्यंत घरी येतात अशा प्रकारे साक्षीदारांनी सांगितल्यावरुन सदरचा बेलिफ रिपोर्ट दाखल केला आहे”.

२. याकामी नि.७ वरील आटपाडी न्यायालयाच्या अधिक्षकांचा रिपोर्ट पाहता सदर प्रतिवादी नं.१ हे परगावी राहतात असा स्पष्ट अहवाल दि. ११/०१/२०२३ रोजी दिलेला आहे. सी.पी.सी. ऑर्डर ५ रुल १७ मधील तरतुदींचे अवलोकन केले असता After using all due and reasonable diligence,

cannot find defendant who is absent from him residence. सदरची ही तरतुद बेलिफचा रिपोर्ट पाहता पुर्ण झालेली दिसुन येत नाही. कारण बेलिफ रिपोर्टमध्ये कोठेही प्रतिवादी नं.१ चे राहत्या घरी जाऊन चौकशी केली व प्रतिवादी नं.१ भेटले नाहीत असे या रिपोर्टमध्ये नमुद नाही. तसेच प्रतिवादी नं.१ ची आई प्रतिवादी नं.२ ता. ०३/०३/२०२३ रोजी संपुर्ण दिवसभर घरीच होती. त्यामुळे घरी कोणीही समक्ष भेटले नाही किंवा कसे याबाबतची स्पष्टता या रिपोर्टमध्ये नाही.

३. त्यामुळे सदरचा बेलिफ रिपोर्ट हा अतिशय मोघम असुन सी.पी.सी. ऑर्डर ५ रुल १७ तील तरतुदींना हरताळ फासणारा आहे. There was no likelihood of him being found at his residence within a reasonable time and that there was no other person duly authorized to accept the service on his behalf. या सी.पी.सी. ऑर्डर ५ रुल १७ मधील मुलभूत तरतुदींची सदर बेलिफ रिपोर्टमध्ये कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. वरील सर्व घटना-घडामोडींचा न्यायपुर्वक विचार करता प्रतिवादी नं.१ यास सी.पी.सी. तील तरतुदींप्रमाणे बजावणी झालेली नसुन वादींना त्याबाबत प्रतिवादी नं.१ यास समन्स बजावणेकामी योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली.

४. सदर अर्जावर बेलिफ यांनी आपले म्हणणे नि. १७ वर दाखल केलेले आहे. त्यांचे म्हणणेनुसार मा. सह दिवाणी न्यायालय क. स्तर आटपाडी यांचे कोर्टातील रे.दि.मु.नं. १९/२०२३ मधील नि. १६ कडील गावामंध्ये तलाठी, ग्रामपंचायत कार्यालये नसल्यामुळे सदर कार्यालयातील कोतवाल अथवा ग्रामपंचायत कर्मचारी व पोलीस

पाटील न भेटलेमुळे प्रतिवादी नं.१ याचेवर समन्स व नोटीस बजावणीकामी त्यांची मदत घेता आली नाही. प्रतिवादी नं.१ याचेवर समन्स व नोटीस बजावणी कामी त्यांचे दिले पत्यावर घरी दि. ०३/०३/२०२३ रोजी आले असता ते समक्ष भेटले नाहीत. त्यांचे घरी इतर कोणीही व्यक्ती भेटले नाहीत म्हणुन प्रतिवादी नं.१ यांचे शेजारी व गावात चौकशी केली असता प्रतिवादी नं.१ हे गावाकडे आलेची खात्रीशीर माहिती मिळुन आलेमुळे त्याचे घराशेजारील दोन सज्ञान व्यक्तींचे समक्ष व त्यांची सही घेऊन प्रतिवादी नं.१ याचे राहते घराचे दर्शनी दारास डकवुन बजावणी केली आहे. तसेच सदरची बजावणी एन स्टेपद्वारे देखील केली आहे व तसा अहवाल समन्स व नोटीसवर नमुद केला आहे. असे त्यांचे म्हणणे सादर केले आहे.

५. वादी यांनी नि.१८ नुसार सदर अर्जास आपले म्हणणे दाखल केले. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी नं.१ यांना बेलिफमार्फत दि. ०३/०३/२०२३ रोजी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ५ रुल १७ प्रमाणे बजावणी केलेली आहे, परंतु प्रतिवादी नं.२ यांना कोणताही कायदेशीर अधिकार नसताना दि. १७/०३/२०२३ रोजी आटपाडी कोर्टातील बेलिफने प्रतिवादी नं.१ यांना केलेल्या समन्स बजावणीबाबत आक्षेप घेतला आहे.

६. वास्तविक पाहता यातील प्रतिवादी नं.२ यांना प्रतिवादी नं.१ यांच्या बजावणीबाबत आक्षेप घेण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. केवळ वादीस न्यायापासुन वंचित ठेवण्यासाठी व सत्य परिस्थिती लपवुन सदर प्रतिवादी नं.१ हा दाव्यातील नमुद पत्यावर राहत असतानाही खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

सदरकामी बेलिफद्वारे केलेल्या एन.स्टेप बजावणीमधील घर हे प्रतिवादी नं.१ व २ यांचेच आहे त्यामुळे प्रतिवादी नं.१ यांना कायद्याप्रमाणे बजावणी झालेली आहे. तरी प्रतिवादी नं.१ यांच्या समन्स बजावणीबाबत वरील सर्व बाबींचा विचार करुन योग्य तो आदेश करावा अशी विनंती केली.

७. अभिलेखाचे अवलोकन केले व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे व म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद केला. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाटप व पृथक कब्जासाठी, निरंतर ताकीदीसाठी व डिक्लेरेशनसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या दाव्यातील कथनानुसार व वंशावळीनुसार वादी ही प्रतिवादी नं.१, ३, ४ यांची आत्या आहे. वादमिळकत ही वादी व प्रतिवादी नं.१ ते ५ यांची वाडवडीलार्जित जमीन आहे. प्रतिवादी नं.१ चे वडील व प्रतिवादी नं.२ चे पती मयत झाल्यानंतर प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी केरु कृष्णा थोरात यांच्या मृत्युनंतर वादीचा हक्क व हिस्सा बुडविण्याकरीता अपुर्ण वंशावळ दाखवुन दि.१०/०८/२०२२ रोजी नियमित दिवाणी दावा नं.२०६/२०२२ दाखल करुन दि. २६/०९/२०२२ रोजी बेकायदेशीर तडजोड घडवुन आणली.

८. सदर दावा दाखल झाल्यानंतर प्रतिवादी नं.१ ते ५ यांना सदर दाव्याचे समन्स व ताकीद अर्जाचे कारणे दाखवा नोटीस दाव्यात दिलेल्या पत्यावर काढण्यात आली होती. पैकी प्रतिवादी नं.२ यांना सदर दाव्याचे समन्सची व कारणे दाखवा नोटीसची प्रत्यक्ष बजावणी झालेली आहे. प्रतिवादी नं.२ ची बजावणी करत असताना कोर्ट बेलिफ हे प्रतिवादी नं.१ यास बजावणी करण्यास गेले असता प्रतिवादी

नं.२ कडे प्रतिवादी नं.१ यांची चौकशी केली असता तो त्यांचा मुलगा आहे व तो कामानिमित्त परगावी असुन तारखेपुर्वी घरी येऊ शकणार नाही म्हणुन सदरची बजावणी केली नाही असा बेलिफ रिपोर्ट नि.६ व ७ नुसार दिलेला आहे.

**९.** त्यानंतर प्रतिवादी यांनी नि. १५ नुसार प्रतिवादी नं.१ हा वरील पत्यावर आला असल्याचे समजल्याने फेरसमन्स व कारणे दाखवा नोटीस काढणेसाठीचा अर्ज दिला. त्यानुसार प्रतिवादी नं.१ व उर्वरित प्रतिवादी यांच्याविरुध्द फेरसमन्स काढण्यात आले. प्रतिवादी नं.१ चे बजावणीकरीता बेलिफ गेले असता त्यांनी रिपोर्ट दिला की, दिलेल्या पत्यावर जाऊन प्रतिवादी नं.१ यांचा तपास करता ते भेटले नाहीत परंतु सही करणार ग्रामस्थ व शेजारी यांनी प्रतिवादी नं.१ हे गावी आले असुन ते कामानिमित्त बाहेर गेले असतील व संध्याकाळपर्यंत घरी परत येतात अशी खात्रीशीर माहिती सांगितल्याने बेलिफ यांनी समन्स व कारणे दाखवा नोटीस त्यांचे राहते घराचे पुढील बाजुस साक्षीदारांचे समक्ष डकवुन बजावणी केली.

**१०.** त्यानंतर प्रतिवादी नं.२ यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी नं.२ ही प्रतिवादी नं.१ ची आई आहे. प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी दिवाणी दावा क्र. २०६/२०२२ आटपाडी येथील दिवाणी न्यायालयामध्ये वाटपाकरीता दि. ११/०८/२०२२ रोजी दाखल केला होता व सदरच्या दाव्यात प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी दि.२६/०९/२०२२ रोजी आपसात तडजोड करुन तडजोड हुकूमनामा करुन घेतला. सदर दाव्याची निशाणी १ व हुकूमनाम्याची प्रत वादी यांनी याकामी दाखल केलेली आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी नं.१ हा वादी असुन त्यामध्ये त्याचा पत्ता हा

गुळेवाडी (विभुतवाडी) ता. आटपाडी, जि. सांगली असा नमुद केलेला आहे. सदर दावा हा दि. १०/०८/२०२२ रोजी दाखल करुन दि.२६/०९/२०२२ रोजी तडजोड करण्यात आला. त्या कालावधीमध्ये प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं.१ याचा पत्ता हा गुळेवाडी (विभुतवाडी) ता. आटपाडी, जि. सांगली असाच होता. दिवाणी दावा २०६/२०२२ हा आपसी तडजोड झाल्यानंतर ३ महिने १७ दिवसात वादीने सदर दिवाणी दावा नं. १९/२०२३ दाखल केला.

**११.** प्रतिवादी नं.२ यांनी प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी नं.१ हा परराज्यात असतो असे कथन केलेले आहे. प्रतिवादी नं.१ हा केव्हापासुन व्यवसायानिमित्त परराज्यात असतो याबाबत प्रतिवादी नं.२ यांनी त्यांचे सदर अर्जामध्ये काहीही कथन केलेले नाही. दिवाणी दावा क्र. २०६/२०२२ चे अवलोकन केले असता प्रतिवादी नं.१ याचा पत्ता हा गुळेवाडी (विभुतवाडी) ता. आटपाडी, जि. सांगली हाच असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी नं. २ हा जर पुर्वीपासुन परराज्यात राहत असेल तर त्याने दावा नं. २०६/२०२२ मध्ये त्याने त्याचा पत्ता गुळेवाडी हा का नमुद केला यावरुन प्रतिवादी हा वरील पत्यावरच राहतो हि बाब प्रथमदर्शनी दिसुन येते.

**१२.** न्यायालयीन बेलिफ यांनी प्रतिवादी नं.१ याचे समन्स एन. स्टेपद्वारे त्याचे घराचे दारावर साक्षीदारांसमक्ष डकवुन बजावणी केलेली आहे. यापुर्वी न्यायालयीन बेलिफ यांनी प्रतिवादी नं.२ यांना त्याच पत्यावर प्रतिवादी नं.२ यांची बजावणी केलेली आहे. त्यामुळे सदरचे घर हे प्रतिवादी नं.१ याचे आहे याची निश्चित कल्पना न्यायालयीन बेलिफ यांना आहे. तसेच बेलिफ यांनी सदरची बजावणी ही नि.६ व ७

वरील रिपोर्ट खाली नमुद साक्षीदारांसमक्ष केल्याचे दिसुन येते.

१३.         दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम १७ मध्ये प्रतिवादी हे समन्सची बजावणी करुन घेण्यास नकार देत असतील किंवा प्रतिवादी मिळुन येत नसतील तर त्याबाबतची प्रक्रिया सांगितलेली आहे. त्यानुसार बजावणी बेलिफ यांनी सर्व योग्य ते परिश्रम घेऊन प्रतिवादी हा मिळुन आला नाही किंवा तो बजावणी करणेच्या वेळेस त्याच्या राहणेच्या ठिकाणावर आढळुन आला नाही आणि तो वाजवी वेळेत निवासस्थानात सापडण्याची शक्यता नाही आणि त्याच्या वतीने समन्स स्वीकारण्याकरीता कोणी अधिकृत व्यक्ती नसेल त्यावेळी बजावणी बेलिफ हा त्याच्या सामान्यतः राहण्याच्या घराच्या बाहेरील द्वारावर सदर समन्सची डकवुन बजावणी करु शकतो.

१४.         प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी नं.२ हिने प्रतिवादी नं.१ हा कामानिमित्त बाहेर असतो असे पुर्वीच्या बेलिफनुसार सांगितल्याचे दिसुन येते. प्रतिवादी नं.१ने दावा दाखल करुन तडजोड केली होती त्या दाव्यामध्ये प्रतिवादी नं.१ चा पत्ता हा गुळेवाडी (विभुतवाडी) ता. आटपाडी, जि. सांगली हाच आहे. न्यायालयीन बेलिफ हे बजावणीकरीता गेले असता प्रतिवादी नं.१ हा घरी मिळुन आला नाही. त्यामुळे त्यांनी शेजारी राहणा-या इसमांसमक्ष त्याचे नमुद पत्यावर असलेल्या घराच्या बाहेरील दारावर समन्सची चिकटवुन बजावणी केलेली आहे. एन स्टेपमधील बजावणी रिपोर्टमधील घर हे प्रतिवादी नं.१ याचे नसल्याचे कोठेही नाकारण्यात आलेले नाही.  बेलिफ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम १७ मध्ये नमुद प्रक्रिया पार पाडलेली आहे.

न्यायालयीन बेलिफ यांनी आदेश ५ नियम १७ मधील तरतुदींचे पालन केल्याचे दिसुन येते. त्यामुळे न्यायालयीन बेलिफ यांनी प्रतिवादी नं.१ याचेविरुध्द केलेली बजावणी ही आदेश ५ नियम १७ नुसारच आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी नं.२चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.07.20 17:08:36 +0530

आटपाडी. **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक– १९/०७/२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 19.07.2023
Order signed by the
Presiding Officer on - 19.07.2023
Order uploaded on - 19.07.2023